# :: प्रेस नोट ::

दिनांक : ०५/१२/२०२५

**<u>विषय</u>** :- दिनांक १३, डिसेंबर २०२५ रोजी होणा-या लोकअदालतीमध्ये प्रलंबित ई चलान केसेसची प्रकरणे तडजोडीने मिटविण्यासाठी अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे वतीने ठेवण्यात येणार नसलेबाबत.

---ooo---

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाकडुन ई चलान केसेस तडजोडीने मिटविण्यासाठी सन २०२१ पासुन महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस घटकांचे वतीने सहभागासाठी मा. सचिव, महाराष्ट्र राज्य विधी व सेवा प्राधिकरण, मुंबई यांची मंजुरी घेवुन प्रलंबित ई चलान केसेसचा निपटारा होणेकरीता प्रयत्न केले जातात.

दिनांक १३, डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य विधी व सेवा प्राधिकरण यांचे मार्फतीने लोक अदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. परंतु, सदर लोक अदालतीमध्ये अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडुन ई चलान केसेस तडजोडीसाठी ठेवण्यात येणार नाहीत.

परंतु, दिनांक १३, डिसेंबर २०२५ रोजी होणा-या लोकअदालतीमध्ये ई चलान केसेसच्या दंडाच्या रकमेमध्ये सवलत दिली जाणार याबाबत काही युटयुब, इंस्टाग्राम यासारख्या सामाजिक संकेस्थळावरुन काही वापरकर्ते हे चुकीची माहिती पसरवित असलेबाबत निदर्शनास येत आहे. त्यामुळे नागरिकांची आर्थीक फसवणुक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी, महाराष्ट्रातील जनतेस याव्दारे आवाहन करण्यात येते की, दिनांक १३, डिसेंबर २०२५ रोजी होणा-या लोक अदालतीमध्ये अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाचे वतीन प्रलंबित ई चलान केसेस तडजोडीसाठी ठेवण्यात येणार नसल्याने नागरिकांनी सामाजिक संकेस्थळावरुन फिरणा-या फसव्या व चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवु नये. तसेच कोणत्याही अनधिकृत लिंकव्दारे ई चलान केसेसच्या दंडाची भरणा करु नये.

ज्या नागरिकांची ई चलान केसेसची प्रकरणे स्थानिक जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण यांनी तडजोडीसाठी ठेवली असतील, अशा वेळी नागरिकांना संबंधित न्यायालयात अथवा स्थानिक वाहतुक पोलीसांशी संपर्क साधावा. सदर बाबत खातरजमा केल्यानंतरच पुढील कारवाई करावी.